# राज्य निवडणूक आयोग

## महाराष्ट्र

१ ला माळा, नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.


---

(प्रसिद्धिपत्रक) दि. १८ डिसेंबर २०२२

**ग्रामपंचायतींच्या निवडणुकांसाठी प्राथमिक अंदाजानुसार ७४ टक्के मतदान**

मुंबई, दि. १८ (रानिआ): राज्यभरातील ७ हजार १३५ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्राथमिक अंदाजानुसार आज सरासरी सुमारे ७४ टक्के मतदान झाले. यावेळी सदस्यपदांसह थेट सरपंचपदासाठीदेखील मतदान पार पडले.

राज्य निवडणूक आयोगाने ७ हजार ७५१ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांची घोषणा केली होती. त्यातील काही ठिकाणी सरपंचपदाच्या, तर काही ठिकाणी सदस्यपदाच्या निवडणुका बिनविरोध झाल्या. त्यामुळे आज प्रत्यक्षात ७ हजार १३५ ग्रामपंचायतींसाठी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान झाले. दुपारी ३.३० पर्यंत प्राथमिक माहितीनुसार सरासरी ६७ टक्के मतदान झाले होते. नक्षलग्रस्तभागात दुपारी ३.३० वाजेपर्यंतच मतदानाची वेळ होती. सर्व ठिकाणी २० डिसेंबर २०२२ रोजी मतमोजणी होईल.

प्रत्यक्ष मतदान झालेल्या ग्रामपंचायतींची जिल्हानिहाय संख्या: ठाणे - ३५, पालघर - ६२, रायगड - १९१, रत्नागिरी - १६३, सिंधुदुर्ग - २९१, नाशिक - १८८, धुळे - ११८, जळगाव - १२२, अहमदनगर - १९५, नंदुरबार - ११७, पुणे - १७६, सोलापूर - १६९, सातारा - २५९, सांगली - ४१६, कोल्हापूर - ४२९, औरंगाबाद - २०८, बीड - ६७१, नांदेड - १६०, उस्मानाबाद- १६५, परभणी - ११९, जालना - २५४, लातूर - ३३८, हिंगोली - ६१, अमरावती - २५२, अकोला - २६५, यवतमाळ - ९३, बुलडाणा - २६१, वाशीम - २८०, नागपूर - २३४, वर्धा - १११, चंद्रपूर - ५८, भंडारा - ३०४, गोंदिया - ३४५, गडचिरोली- २५. एकूण - ७,१३५.

-०-०-०-

(Jagdish More, SEC)